माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३१२४**
**व**
**रामाआ तक्रार क्र. बीएम- ६८२/२०२४**

**अपिलार्थी श्रीम. विजू बी चव्हाण**
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी -१**
उपनिबंधक, सहकारी संस्था, पी विभाग, मुंबई यांचे कार्यालय, रुम नं ३०३,
तिसरा मजला, ए विंग, बी एम सी गोडाऊन बिल्डिंग, संस्कृती कॉम्पेक्स जवळ,
ठाकूर कॉम्प्लेक्स, ९० फुट रोड, कांदिवली (पू), मुंबई- ४०० १०१
**प्रथम अपिलीय अधिकारी**
उपनिबंधक, सहकारी संस्था, पी विभाग, मुंबई यांचे कार्यालय, रुम नं ३०३,
तिसरा मजला, ए विंग, बी एम सी गोडाऊन बिल्डिंग, संस्कृती कॉम्पेक्स जवळ,
ठाकूर कॉम्प्लेक्स, ९० फुट रोड, कांदिवली (पू), मुंबई- ४०० १०१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २७.०१.२०२५**

अपीलकर्ता/तक्रारकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ११.०७.२०२४ | ०१.०८.२०२४ व २०.०९.२०२४ | २०.०८.२०२४ | १९.०९.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १८.१०.२०२४ रोजीच्या अर्जान्वये एकाच समान विषयासंदर्भात द्वितीय अपील व तक्रार अर्ज दाखल केले आहेत.

अपिलार्थींनी/ तक्रारकर्त्याने दि.१०.०६.२०२४ रोजी झालेल्या अंतिम सुनावणीचे आदेशाविषयी माहिती विचारली होती.

जन माहिती अधिकारी यांचेकडून उत्तर प्राप्त न झाल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहित कालावधीत सुनावणी आदेश पारीत केले नाहीत म्हणून त्यांनी आयोगाकडे एकाच दिवशी (दि. १८.१०.२०२४) द्वितीय अपील व तक्रार अर्ज सादर केले. सदर तक्रार आयोगाच्या कार्यालयात तक्रार क्रमांक बीएम-६८२/२०२४ या क्रमांकावर नोंदविण्यात आली.

सदर द्वितीय अपील व तक्रार अर्जावर एकत्रितपणे सुनावणी घेण्यात आली. अपील/तक्रार अर्जावर झालेल्या सुनावणीस अपिलार्थी/तक्रारकर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

..२/-

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे निवेदन दिनांक २७.०१.२०२५ आयोगास सादर केले. त्यांनी आयोगास नमूद केले की, दि.०१.०८.२०२४ चे पत्रान्वये तक्रारकर्त्यांस कळविले होते की, त्यांनी मागणी केलेल्या माहिती बाबत आदेश पारीत झालेले नसल्याने देता येत नाहीत व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन अपील अंशत: मान्य करुन अपिलार्थी/ तक्रारकर्ता यांना १५ दिवसात माहिती पुरविण्याचे आदेशीत केले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानुसार दि.२०.०९.२०२४ चे पत्रान्वये त्यांनी अपिलार्थीस/तक्रारकर्त्यांस मुद्देनिहाय उत्तर दिले आहे आणि कळविले आहे की,मुद्दा क्र.१ बाबत त्यांनी मागणी केलेल्या माहितीबाबतच आदेश अजून पारीत केलेला नसल्यामुळे देता येत नाही. तसेच मुद्दा क्रमांक दोन व तीन बाबत कळविले आहे की, या कार्यालयात आपण व साई मिलाप को.ऑप. हौसिंग सोसायटीची सुनावणी चालू असल्यामुळे सदर पत्र सुनावणी धारिकेमध्ये लावण्यात आलेले आहे.

अपिलार्थी/तक्रारकर्ते यांनी त्यांचे निवेदन दिनांक २७.०१.२०२५ आयोगास सादर केले आहे. त्यांनी आयोगास नमूद केले की, जन माहिती अधिकारी यांचे पत्र दिनांक ०१.०८.२०२४ व २०.०९.२०२४ तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश त्यांना अप्राप्त आहेत.

या प्रकरणात उपलब्ध कागदपत्रं आणि अपिलार्थी/तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर असे निदर्शनास येते की, अपिलार्थी यांनी एकाच विषयाशी संबंधित माहिती अर्जास अनुसरुन अधिनियमाच्या कलम १९(३) प्रमाणे द्वितीय अपील व कलम १८ प्रमाणे तक्रार अर्ज अशा दुहेरी प्रक्रीयेचा (Dual Procedure) एकाच वेळी अवलंब केला आहे. वास्तविकत: माहिती अर्ज व प्रथम अपील प्रक्रीयेनंतर विहित कार्यपध्दतीनुसार फक्त अपील प्रक्रीया ग्राह्य ठरते तर त्याच समान विषयावर थेटपणे तक्रार दाखल करणे योग्य ठरत नाही.

तथापि,जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दिनांक ०१.०८.२०२४ व २०.०९.२०२४ तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १९.०९.२०२४ व सदर पत्रे अपिलार्थींना यापूर्वी पाठविले असल्याबाबत जावक नोंदवहीची प्रत अपिलार्थींना/तक्रारकर्त्यांना सदर आदेश प्राप्तीचे १५ दिवसात रजिस्टर पोस्टाने पुन्हा पाठवावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१. जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनाप्रमाणे कार्यवाही करावी.**

**२. अपील क्रमांक ३१२४/२०२४ व तक्रार क्रमांक ६८२/२०२४ निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ३०.०१.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**